**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः02.12.2025** **वारः** मंगळवार

---

•राज्यातल्या 264 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी आज मतदान,

•काही मतदारसंघांमध्ये निवडणुका पुढे ढकलण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयावर विविध पक्षांची टीका,

•संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात; विरोधकांच्या गदारोळामुळे पहिल्याच दिवशी कामकाजात व्यत्यय,

आणि

•विकसित भारताच्या उभारणीत नौदलाची निर्णायक भूमिका असेल - नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांचा विश्वास.

**<u>मतदान-निवडणूकआयोग</u>**

राज्यातील 264 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान होत असून, त्यासाठी संपूर्ण मतदान यंत्रणा सज्ज झाली आहे. एकंदर 12 हजार 316 मतदान केंद्रांसाठी 62 हजार 108 निवडणूक अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या 264 अध्यक्षपदांच्या आणि 6 हजार 42 सदस्यपदांच्या जागांसाठी आज सकाळी साडेसात वाजता मतदानाला सुरुवात होईल. संध्याकाळी साडेपांच वाजेपर्यंत मतदानाची वेळ आहे. मतमोजणी उद्या, ३ डिसेंबर रोजी होणार आहे. या मतदानासाठी संबंधित ठिकाणी आज सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठीच्या प्रचाराच्या अखेरच्या दिवशी, काल दिवसभर विविध पक्षांच्या नेत्यांनी जोरदार प्रचार केला.

दरम्यान, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय 23 नोव्हेंबर किंवा त्यानंतर आल्यानं 24 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या अध्यक्षपदाच्या आणि सदस्यपदांच्या निवडणुकांसाठी आज मतदान होणार नाही. सुधारित कार्यक्रमानुसार या सर्व ठिकाणी येत्या 20 डिसेंबर रोजी मतदान होईल, असं

राज्य निवडणूक आयोगानं कळवलं आहे. या मतदारसंघांमध्ये जाहीर केलेली सुट्टी केवळ त्या मतदारसंघापुरती रद्द करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या या निर्णयाला सर्वच राजकीय पक्षांनी विरोध केला आहे. निवडणुका पुढे ढकलण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा हा निर्णय चुकीचा आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं सांगितलं. हा निर्णय इतर उमेदवारांवर अन्याय करणारा असून तो कायद्याला धरून नाही, असं ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही हा निर्णय चुकीचा असल्याचं मत व्यक्त केलं. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या निर्णयावर टीका केली आहे.

**<u>अधिवेशन</u>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला कालपासून सुरुवात झाली. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चेची मागणी केली. यावेळी केलेल्या घोषणाबाजीमुळे लोकसभेचं कामकाज आधी दुपारी १२ पर्यंत, नंतर दुपारी २ वाजेपर्यंत आणि अखेर दिवसभरासाठी तहकूब झालं.

तत्पूर्वी लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांनी दिवंगत अभिनेता धर्मेंद्र यांच्यासह अन्य दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहिली. अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी काल आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक, २०२५ सभागृहात सादर केलं. राज्यसभेत सभागृहाचं अध्यक्षपद भूषवणारे सी.पी. राधाकृष्णन यांचं पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वागत यांनी केलं. राधाकृष्णन यांचा उपराष्ट्रपतीपदापर्यंतचा प्रवास लोकशाहीची खरी ताकद दर्शवतो, असं मोदी म्हणाले. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी राधाकृष्णन निःपक्षपातीपणे वागणूक देतील, अशी आशा व्यक्त केली.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसद भवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना संबोधित केलं. “हिवाळी अधिवेशन ही फक्त एक औपचारिकता नाही; तर त्याद्वारे देशाला विकासाकडे नेण्याच्या प्रयत्नांना चालना मिळते”, असं प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं.

**<u>नौदलप्रमुख</u>**

“भारताची सागरी शक्ती, आत्मनिर्भरता आणि विकसित भारताच्या उभारणीत नौदलाची निर्णायक भूमिका असेल”, असं प्रतिपादन नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी काल पुण्यात केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागानं आयोजित केलेल्या जनरल बी. सी. जोशी स्मृति व्याख्यानात ते बोलत होते.

भारताला लाभलेली मोठी किनारपट्टी, तसंच भारताचं सागरी क्षेत्रातील सामरिक आणि आर्थिक महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं. युद्धनौका बांधणीच्या क्षेत्रात देश स्वावलंबी होणं महत्त्वाचं असून या माध्यमातून नवीन रोजगार निर्मितीही होणार असल्याचं ते म्हणाले.

**<u>गीता जयंती</u>**

“समरसता, बंधुभाव, एकता राखणं ही वेदांची शिकवण असून संघटन ही एक ताकद असल्याचा वेदांचा उपदेश आपल्या जीवनात अंगीकारण्याची गरज आहे”, असं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केलं. पुण्याजवळ मोशी इथल्या वेदश्री तपोवन इथं आयोजित गीता जयंती महोत्सवात ते काल बोलत होते. मानवाची आध्यात्मिक भूक भागवण्यासाठी आपल्याला वेद, गीता, उपनिषदांकडे पुन्हा जावं लागेल, असंही ते यावेळी म्हणाले. अयोध्येतील श्रीराम मंदिर तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष गोविंददेवगिरी महाराज यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काल आळंदीलाही भेट दिली. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरामध्ये जाऊन दर्शन घेतलं.

**<u>Intro</u>**

**<u>लघुपट</u>**

मुंबईत २९ आणि ३० नोव्हेंबर रोजी झालेल्या १५व्या इंटरनॅशनल फिल्म प्रोजेक्ट फेस्टिव्हलमध्ये रत्नागिरीतल्या कलाकारांनी साकारलेल्या 'डुन्नू' या लघुपटाची 'सर्वोत्कृष्ट २५'मध्ये निवड झाली आहे. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**<u>स्क्रिप्ट</u>**

इंटरनॅशनल फिल्म प्रोजेक्ट फेस्टिव्हलमध्ये 50 hours filmmaking challenge अर्थात ५० तासांमध्ये लघुपट बनवण्याची स्पर्धा घेतली जाते. दिलेल्या विषयावर संकल्पनेपासून कथा-पटकथा, कलाकार आणि चित्रिकरण स्थळाची निवड, चित्रिकरण, संकलन-संपादन, गाणी आणि संगीतापर्यंतचे असे सगळे टप्पे केवळ ५० तासांमध्ये पूर्ण करायचे असतात. त्यातून तयार झालेला लघुपट स्पर्धेसाठी सादर करायचा असतो. यंदा २३ देशांमधल्या ३५० शहरांमधून ४० हजारांहून अधिक लघुपट स्पर्धेत होते. त्यातून रत्नागिरीतल्या कलाकारांच्या 'डुन्नू' या लघुपटाची 'सर्वोत्कृष्ट २५'मध्ये निवड झाली. सिनेमॅटोग्राफर बनण्याचं स्वप्न असलेल्या एका लहान मुलाची गोष्ट यात प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. लघुपटाचं लेखन-दिग्दर्शन सुमित मालप यांनी केलं असून, गौरांग आगाशे आणि धीरज पाटकर यांनी निर्मिती केली आहे. यातले सर्व कलाकार रत्नागिरीतलेच आहेत. 'दी लास्ट टेबल स्टुडिओ'ची निर्मिती असलेल्या या

लघुपटाच्या चमूला रौप्यपदकाने सन्मानित करण्यात आलं. या यशामुळे रत्नागिरीच्या शिरपेचात नवा तुरा खोवला गेला आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी

**<u>व्हर्च्युअल वॉक थ्रू</u>**

**<u>इंट्रो-</u>**

पुण्यातील एक महत्त्वाचं वारसा स्थळ असलेल्या पाताळेश्वर लेण्याच्या व्हर्च्युअल वॉक थ्रू प्रकल्पाचं उद्घाटन नुकतंच म्हणजे जागतिक वारसा सप्ताहाच्या निमित्तानं करण्यात आलं. या प्रकल्पाच्या माध्यमातून पाताळेश्वर लेण्याची माहितीपूर्ण सफर आता घरबसल्या करता येणार आहे. वारसा स्थळांमध्ये दडलेला गौरवशाली इतिहास सर्वदूर पोहोचावा, या संकल्पनेतून तयार झालेल्या या प्रकल्पविषयी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे मुंबई मंडळाचे अधीक्षक डॉक्टर अभिजीत आंबेकर यांनी आकाशवाणीला माहिती दिली......

**<u>मुदतवाढ</u>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत येत्या २२ फेब्रुवारीला घेण्यात येणाऱ्या पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ८ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानंतर 31 डिसेंबरपर्यंत विलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहेत.

**<u>पुस्तकप्रकाशन</u>**

सोलापूर जिल्ह्यात पुरामुळे बाधित झालेल्या गावांमध्ये 'सेवा भारती'संस्थेच्या वतीनं मदत कार्य करण्यात आलं. या मदतकार्याची माहिती देणाऱ्या 'सेवा धर्म महान' या पुस्तिकेचं प्रकाशन काल पुण्यात संस्थेचे अखिल भारतीय संघटनमंत्री सुधीरकुमार यांच्या हस्ते झालं. यावेळी सुधीरकुमार यांनी 'सेवा भारती'च्या कार्याचा गौरव केला.

**<u>अपघात</u>**

सोलापूर जिल्ह्यात बार्शी-लातूर महामार्गावर झालेल्या अपघातात काल पाच जणांचा मृत्यू झाला. कार आणि भरधाव ट्रक यांची धडक होऊन हा अपघात झाला.

**खेलोइंडिया**

राजस्थानमध्ये विद्यापीठ स्तरावरील पाचवी खेलो इंडिया स्पर्धा सुरू आहे. काल कुस्तीमध्ये पुरुष गटात ग्रीको रोमन प्रकारात 55 किलो वजनी गटात पुण्याच्या अजय निंबाळकरने रौप्यपदक पटकावलं. महिला गटात शिवाजी विद्यापीठाच्या समृद्धी घोरपडे हिने 53 किलो वजनी गटात, तर सृष्टी भोसले हिने 65 किलो वजनी गटात कास्य पदकाची कमाई केली. स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानं ६ सुवर्ण, ११ रौप्य आणि ९ कास्य अशा २६ पदकांची कमाई केली असून  पदक तालिकेत विद्यापीठ सहाव्या स्थानावर आहे.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात किमान तापमानात घट झाली आहे. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता असून मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येईल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.